अमन मित्तल
भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, कोल्हापूर

सत्यमेव जयते

कार्यालय : (०२३१) २६५५५९८
निवास : (०२३१) २६००४०६
ईमेल : ceozp.kolhapur@maharashtra.gov.in
वेबसाईट : www.zpkolhapur.gov.in

अ.शा. पत्र नं. कोजिप/ आरोग्य /वशि/माकुमाज/2020
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर.
दिनांक १४/९/२०२०

**विषय - " माझे कुटुंब, माझी जबाबदारी"**

महोदय,

कोल्हापूर जिल्हयातील सर्व तालुक्यातील गांवा मध्ये कोवीड-19 विषाणूजन्य साथीचा प्रार्दुभाव मोठया प्रमाणात झालेला आहे. या आजाराचे गांभिर्य लक्षात घेता आपण त्यापासून स्वतःचा बचाव करणे गरजेचे होवून बसले आहे. बऱ्याच कुटुंबानी आपल्या आप्तेष्टांना कोवीड-19 संसर्ग होताना पाहिले आहे. यांची खंत त्यांच्या कुटुंबीच्या मनाला आयुष्यभर लागून राहून राहिल यांची मला जाणीव आहे. कोल्हापूर जिल्हयात कोवीड-19 या विषाणूजन्य आजाराचे प्रमाण ग्रामीण भागात वाढत आहे. काही प्रमाणात निर्बध शितिल करण्यात आलेमुळे लोक मोठया प्रमाणात बाहेर पडत आहे. लोकांना कोवीड-19 प्रतिबंधासाठी करावयाच्या उपाय योजना बाबत मोठया प्रमाणात आरोग्य शिक्षण देणे ,जनजागृती निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे.

यासाठी जिल्हयामध्ये आपण जनजागृती व घरोघरी सर्व्हेक्षणासाठी ***" माझे कुटुंब माझी जबाबदारी" ही विशेष मोहिम दिनांक १५ सप्टेंबर २०२० ते १० ऑक्टोबर २०२० आणि १४ ऑक्टोबर २०२० ते २४ ऑक्टोबर २०२० अशा दोन मोहिमा या कालावधीत राबविण्यात येत आहे.*** ही मोहिम लोकसहभागासाठी असून, या विशेष सर्व्हेक्षण व जनजागृती मोहिमेमध्ये आपण आरोग्य शिक्षण, महात्वाचे आरोग्य संदेश, मधुमेह, उच्चरक्तदाब, हृदयरोग, किडनी विकार, यासारख्या आजार असलेल्या व्यक्तिचे सर्व्हेक्षण करणेत येणार आहे. तसेच संशयित कोवीड-19 रुणांचा शोधणेसाठी प्रयत्न करणार आहोत. या मोहिम कालावधीमध्ये 2794573 ग्रामीण लोकसंख्येतील 656741 घरांना गृहभेटी देणेसाठी 1235 इतके आरोग्य पथक तयार करणेत आलेले आहे. प्रत्येक पथकात तीन सदस्य असतील. मोहिमेत उत्कृष्टकाम करणाऱ्या ग्रामपंचायतीना प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात यईल. बक्षीस योजनेचे स्वरुप खालील प्रमाणे

| अ.क्र. | बक्षीस | राज्यस्तर | जिल्हास्तर | म.न.पा. स्तर | मा. आमदार मतदार संघ स्तर |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ ले बक्षीस | १ लाख | ५० हजार | ५० हजार | १० हजार |
| १ | २ रे बक्षीस | ५० हजार | ३० हजार | ३० हजार | ५ हजार |
| १ | ३ रे बक्षीस | ३० हजार | २० हजार | २० हजार | ३ हजार |

आपण या मोहिमेतील अत्यंत महात्वाचे लोकप्रतिनिधी असल्यामुळे आपली भूमिका अत्यंत महात्वाची आहे. स्वयंसेवक निवडीमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा. आपण आपल्या मतदारसंघातील सर्व ग्रामस्थांना या मोहिमेत सहभागी होणेसाठी प्रेरीत करावे व या आजाराला हरविण्यासाठी महत्वाची भूमिका पार पाडावी असे अहवान मी करीत आहे. कोवीड-19 साथीच्या या लढयात आपण सर्वजण एकत्र लढल्यास या साथीच्या रोगावर नक्कीच मात करु शकतो. आपण या मोहिमेसाठी सक्रिय सहभाग घ्यावा, सहकार्य करावे अशी मी विनंती करतो.

या मोहिमेमध्ये घर, कुटुंब, परिसर, गांव, शहर, समाज आणि देशाच्या हितासाठी तोंडावर मास्क लावणे, शारिरिक अंतराचे पालन करणे, वारंवार हात साबणाने धुणे, कमीत कमी प्रवास करणे, घरी राहणे, या बाबत जनजागृती करावी. आपण सर्वजण एकजुटीने, जागरुकपणे, संयमाने व धीराने या संकटाचा सामना करुया व **माझे कुटुंब माझी जबाबदारी हे कर्तव्य पार पाडूया.** प्रत्येक आरोग्य पथकाला सर्वातोपरी सहकार्य करावे व ही विशेष मोहिम यशस्वी करावी अशी मी विनंती करतो.

आपला स्नेहांकित

(अमन मित्तल)

**प्रति**
सर्व जि.प. सदस्य, पं.स. सदस्य, ग्रा.पं सदस्य
सर्व सामाजिक कार्यकर्ते

Scanned by CamScanner